महाराष्ट्र राज्य सांस्कृतिक धोरण, २०१० अंतर्गत राज्यातील जिल्हयाच्या ठिकाणी ग्रंथोत्सव, २०१७ चे आयोजन करण्यासाठी निधी वितरण करण्याबाबत..

महाराष्ट्र शासन
उच्च व तंत्र शिक्षण विभाग
शासन निर्णय क्रमांक- मराग्रं-२५१७/(११९/२०१७)/साशि-५,
मंत्रालय विस्तार, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : २७ सप्टेबर, २०१७

वाचा : १) शासन निर्णय, मराठी भाषा विभाग, क्र रासांधो-२०१६/प्र.क्र.४२/२०१६/ भाषा-३, दि. १६ जुलै, २०१६
२) शासन निर्णय, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, क्र. मराग्रं-२५१७/(२१७/१५)/साशि-५, दि. १६ फेब्रुवारी, २०१७
३) शासन शुध्दीपत्रक, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, क्र. मराग्रं-२५१७/(२१७/१५)/साशि-५, दि. १० मार्च, २०१७
४) शासन निर्णय, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, क्र. मराग्रं-२५१७/(२१७/१५)/साशि-५, दि. २४ जुलै, २०१७
५) शासन परिपत्रक, वित्त विभाग क्र अर्थसं- २०१७/प्र.क्र.९४/अर्थसं- ३, दि. ३०/०६/२०१७
६) शासन परिपत्रक, वित्त विभाग क्र पूरक २०१७/प्र.क्र.१२९/अर्थ -३, दि. १८/०८/२०१७

प्रस्तावना:-

ग्रामीण व शहरी भागातील जनतेच्या वाचनसंस्कृतीमध्ये वाढ व्हावी या हेतूने राज्य शासनातर्फे ग्रंथोत्सवाचे आयोजन करण्यात येते. ग्रंथप्रेमींना एकाच ठिकाणी विविध ग्रंथ प्राप्त व्हावेत यासाठी तसेच प्रकाशक व ग्रंथविक्रेता यांना ग्रंथविक्रीसाठी एकाच ठिकाणी आवश्यक ती सुविधा उपलब्ध व्हावी हा ग्रंथमहोत्सव आयोजनाचा मुख्य उद्देश आहे. याकरिता शासन पातळीवरील प्रयत्नांचा भाग म्हणून प्रतिवर्षी ग्रंथोत्सवाचे आयोजन करण्यात येते. ग्रंथोत्सव ही योजना यापूर्वी मराठी भाषा विभागामार्फत राबविण्यात येत होती. सन २०१६-१७ पासून सदर योजना उच्च व तंत्र शिक्षण विभागाकडे शासन निर्णय, मराठी भाषा विभाग दि. १६/०७/२०१६ अन्वये हस्तांतरीत करण्यात आलेली आहे. राज्य शासनाच्या उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या अधिपत्याखालील ग्रंथालय संचालनालयामार्फत ग्रंथोत्सव हा उपक्रम राज्यातील जिल्हयाच्या ठिकाणी राबविण्यासाठी या विभागाच्या दि. १६ फेब्रुवारी, २०१७ च्या शासन निर्णयान्वये प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. ग्रंथोत्सव, २०१७ चे आयोजन करण्यासाठी आवश्यक खर्च रु. ५२.५० लाख (अक्षरी रु. बावन्न लाख पन्नास हजार फक्त) जुलै, २०१७ च्या (पावसाळी) अधिवेशनात विधानमंडळाच्या निदर्शनास आणण्यात आला असून सदर मंजूर निधीच्या ७०% निधी म्हणजेच रु. ३६.७५ लाख (अक्षरी रु. छत्तीस लाख पंच्याहत्तर हजार फक्त) इतका निधी वित्त विभागाच्या दि. ३०/०६/२०१७ च्या व दि. १८/०८/२०१७ च्या परिपत्रकान्वये विभागास प्रदान करण्यात आलेल्या अधिकारात ग्रंथालय संचालक, नगर भवन, मुंबई यांना वितरीत करण्यास मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय:

१. महाराष्ट्र राज्य सांस्कृतिक धोरण २०१० अंतर्गत ग्रंथोत्सव, २०१७ चे आयोजन करण्यासाठी रु. ३६.७५ लाख (अक्षरी रुपये छत्तीस लाख पंच्याहत्तर हजार फक्त) इतका निधी ग्रंथालय संचालक, नगर भवन, मुंबई यांना वितरीत करण्यास शासनाची मान्यता देण्यात येत आहे.

२.   सदर निधी नवनिर्मित पालघर जिल्हा वगळून राज्यातील ३५ जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालयास प्रत्येकी रु १.०५ लक्ष (रुपये एक लक्ष पाच हजार फक्त) वितरीत करण्यास ग्रंथालय संचालक, ग्रथालय संचालनालय, महाराष्ट्र राज्य मुबई यांना मान्यता देण्यात येत आहे. तसेच संबंधित जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालयाच्या कार्यालय प्रमुखांना आहंरण व संवितरण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे.

३.   सदर आयोजनासाठी करावयाचा खर्च वितरीत निधीच्या मर्यादेत करण्यात यावा. प्रत्यक्ष निधी खर्च करताना वित्त विभागाच्या वाचा येथिल दि. ३०/०६/२०१७ रोजीच्या परिपत्रकातील अटी व शर्तीचे पालन करावे. त्याबाबत खात्री करुन तसे प्रमाणीत करण्यात यावे. व त्यानंतर प्रत्यक्ष निधी खर्चास उपलब्ध करण्याची जबाबदारी आहंरण व संवितरण अधिकारी यांची राहील. उपरोक्त मंजूर करण्यात आलेला निधी ज्या बाबींसाठी मंजूरी देण्यात आली आहे, त्याच बाबींसाठी खर्च करावा व ग्रंथालय संचालक यांचे मार्फत उपयोगिता प्रमाणपत्र शासनास तातडीने सादर करावे.

४.   यासाठी होणारा खर्च मागणी क्र. डब्ल्यु ४ , (०२)(०२) शासकीय मध्यवर्ती , विभागीय व जिल्हा ग्रंथालये अनिवार्य (२२०५ ०२८९) ३१, सहाय्यक अनुदाने (वेतनेतर) या लेखाशीर्षाखाली सन २०१७-१८ मध्ये अर्थसंकल्पीत निधीतून भागविण्यात यावा.

५.   सदर शासन निर्णय वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र. ८७९/१७ व्यय-५, दि. ०७/०९/५२०१७ अन्वये प्राप्त झालेल्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

६.   सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१७०९२८१२०६५५११०८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने ,

Anil Vithalrao Saware

Digitally signed by Anil Vithalrao Saware
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Higher And Technical Education Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=073348b7a8767f0f7865422df1e65ce2f3bcdf6786e4712e2c088a9ac4ffee3f, cn=Anil Vithalrao Saware
Date: 2017.09.28 11:55:34 +05'30'

(अनिल वि. सावरे)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रति,

१) महालेखापाल, महाराष्ट्र -१ (लेखापरीक्षा/लेखा व अनुज्ञेयता), मुंबई / नागपूर
२) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई / नागपूर
३) ग्रंथालय संचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई
४) निवासी लेखापरीक्षा अधिकारी, मुंबई
५) प्रधान सचिव(उवतंशि) यांचे स्वीय सहाय्यक
६) कक्ष अधिकारी (साशि -१) उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय मुंबई
७) सर्व जिल्हा ग्रंथालय अधिकारी, (ग्रंथालय संचालनालय यांचे मार्फत)
८) निवडनस्ती (साशि-५).